जनसंपर्क कक्ष

27 DEC 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अ‍ॅड.रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठास ३५ लाखांची देणगी

**विद्यापीठ परिसरात विद्यार्थिनींसाठी साकारणार स्वतंत्र अभ्यासिका**

**मानेगाव : प्रतिनिधी**

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे सेवानिवृत्त भूगोल



अधिविभाग प्रमुख व ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ डॉ. राम पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी पेन्शन बचतीतून साठविलेली ३५ लाखांची पुंजी त्यांची एकमेव दिवंगत कन्या कायदेतज्ज्ञ अ‍ॅड.रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली. या देणगीतून शिवाजी विद्यापीठातील 'कमवा व शिका' वस्तीगृहाच्या परिसरात विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका बांधण्यात येणार आहे.

अ‍ॅड.रूपाली पणदूरकर यांनी सर्व शिक्षण शिवाजी विद्यापीठातून पूर्ण केले. वयाच्या अवघ्या ३० व्या वर्षी त्यांनी 'महाराष्ट्रातील बालगुन्हेगारीचा सामाजिक व कायदेविषयक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध सादर करून कायदे विषयात पीएच.डी. मिळविली होती.

सतारवादनाचे शास्त्रशुद्ध शिक्षण गंधर्व महाविद्यालयातून घेऊन सार्वजनिक व्यासपीठांवरुन सतारवादनाचे कार्यक्रम केले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या 'न्यायदीप' या संशोधन पत्रिकेत त्यांचे अभ्यासपूर्ण संशोधन लेख प्रसिद्ध झाले होते. मुलीच्या अकाली निधनाचे दुःख करीत तिच्या स्मरणार्थ बसण्यापेक्षा पणदूरकर दाम्पत्याने हे विधायक व रचनात्मक कार्य केले आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ.विलास शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, वरदराज बापट, प्रा.एस.के. पवार, अ‍ॅड.अमोल रणसिंग उपस्थित होते.



## माता-पित्यांचे दातृत्व अनुकरणीय

डॉ.राम पणदूरकर यांनी आपली दिवंगत कन्या अ‍ॅड.रुपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका निर्मितीसाठी ३५ लाखांची देणगी दिली. ही बाब निश्चितच कौतुकास्पद व अनुकरणीय आहे. मुलीच्या अकाली निधनानंतर समाजातील लेकींना तिच्या स्थानी मानून त्यांच्यासाठी काही तरी भरीव उभे करण्याचे दातृत्व पणदूरकर दांपत्याने दाखविले आहे. पणदूरकर दांपत्यामुळे माता-पित्यांच्या दातृत्वाची प्रचिती आली आहे, अशी भावना कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2023
क्रांतीसिंह

# ॲड.पणदूरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठास ३५ लाख

कोल्हापूर(प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभाग प्रमुख व ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ डॉ. (ॲड.) राम पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी पेन्शन बचती तून साठविलेली पुंजी रु. ३५ लाख आपली एकमेव अपत्य दिवंगत डॉ. (ॲड.) रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या कडे सुपूर्द केली. या देणगीमधून शिवाजी विद्यापीठा तील कमवा व शिका विद्यार्थिनी वसतिगृह परिसरात विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका बांधण्यात येणार आहे. नवीन वर्षात ही अभ्यासिका साकार होईल.

ॲड. रूपाली पणदूरकर यांनी सर्व शिक्षण शिवाजी विद्यापीठातून पूर्ण केले. वयाच्या अवघ्या ३० व्या वर्षी त्यांनी महाराष्ट्रातील बालगुन्हेगा रीचा सामाजिक व कायदेविष यक अभ्यास या विषयावर शोधप्रबंध सादर करून कायदे विषयात पीएच.डी. मिळविली होती. सतारवादनाचे शास्त्रशुद्ध शिक्षण गांधर्व महाविद्यालयातून घेऊन सार्वजनिक व्यासपीठां वरुन सतारवादनाचे कार्यक्रम केले होते. सर्वोच्च न्यायाल याच्या न्यायदीप या संशोधन पत्रिकेत त्यांचे अभ्यासपूर्ण संशोधन लेख सन्मानपूर्वक प्रसिद्ध झाले होते. त्यांनी २००१ पासून १४ वर्षे कोल्हापूर दिवाणी न्यायालयात वकीली केली.

ॲड. रुपाली यांची उद्या (दि. २२ डिसेंबर) जयंती आहे. या जयंतीच्या पूर्वसंध्येला पणदूरकर दांपत्याने कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन ३५ लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश सुपूर्द केला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी पणदूरकर दांपत्याच्या दातृत्वाबद्दल शिवाजी विद्या पीठाच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, वरदराज बापट, प्रा. एस.के. पवार, ॲड.



अमोल रणसिंग उपस्थित होते.

मातापित्यांच्या दातृत्वाची पुनर्प्रचिती: कुलगुरू डॉ. शिर्के

शिवाजी विद्यापीठाचे माजी भूगोल विभाग प्रमुख डॉ. राम पणदूरकर यांनी आपली दिवंगत कन्या ॲड. रुपाली यांच्या स्मरणार्थ विद्यार्थिनीं साठी स्वतंत्र अभ्यासिका निर्मिती साठी ३५ लाख रुपयांची देणगी दिली, ही गहिवरून टाकणारी बाब आहे. मुलीच्या माघारी समाजातील लेकी बाळींना तिच्या स्थानी मानून त्यांच्यासाठी काही तरी भरीव उभे करण्याचे दातृत्व पणदूरकर दांपत्याने दाखविले आहे. गत वर्षी माजी सहाय्यक कुलसचिव पंडित मारुलकर यांनीही त्यांच्या मुलीच्या स्मृतीप्रित्यर्थ दिलेल्या देणगीतून संशोधक विद्यार्थिनींसाठी अस्मिता वसतिगृह उभारण्यात आले आहे. पणदूरकर दांपत्यामुळे मातापित्यांच्या दातृत्वाची पुनर्प्रचिती आली, अशी भावना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी यावेळी व्यक्त केली.

27 DEC 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात उद्यापासून 'अन्वेषण' संशोधन स्पर्धा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी (एआययू) नवी दिल्ली, शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'अन्वेषण' (वेस्ट झोन) विद्यार्थी संशोधन या स्पर्धेचे दि. २८, २९ डिसेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी महाराष्ट्र व गुजरातमधील १० विद्यापीठामधून ११४ विद्यार्थी सहभागी होणार आहेत. स्पर्धा शेती, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, आरोग्य विज्ञान आणि संबंधित विषय, फार्मसी, पोषण, सामाजिक शास्त्र, मानसशास्त्र, वाणिज्य आणि कायदा, आंतरविद्याशाखा आदी सहा प्रकारात होणार आहे. स्पर्धेसाठी एआययू, नवी दिल्लीचे सहसंचालक आणि प्रमुख डॉ. अमरेंद्र पानी व डॉ. एआययू, नवी दिल्लीचे सहायक संचालक (संशोधन) उषा राय-नेगी, कुलगुरू डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यावेळी विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, कविता ओझा आदी उपस्थित राहणार आहेत.



# प्रत्येकाने गणिताप्रती अभिरूची वाढवणे गरजेचे : डॉ. मांजरेकर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

गणित विषय प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित आहे. त्यामुळे सर्वांनी गणिताप्रती अभिरूची वाढविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागाचे सेवानिवृत्त प्रा.डॉ.सी.एस.मांजरेकर यांनी केले.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय गणित दिनानिमित्त गणित विषयांतर्गत आयोजित 'संख्यात्मक सिद्धांत' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे उपस्थित होते. डॉ.मांजरेकर म्हणाले, संख्यात्मक सिद्धांत वापरून कोडिंग थेरी तयार करता येते. त्याचा वापर संरक्षण खात्यामध्ये संदेश पाठविण्यासाठी करतात. सिद्धांताचा बँक, एल.आय.सी.यामध्ये मोठ्या प्रमाणात होतो. संख्या सिद्धांत हा विषय तत्त्वज्ञान व तर्कशास्त्राशी संबंधित आहे. याचा वापर दैनंदिन जीवनात प्रत्येक टप्प्यावर होत असतो.नैसर्गिक संख्यांचा उगम दैनंदिन जीवनातून झाला आहे.

प्रा.डॉ.मोरे म्हणाले की, स्पर्धेच्या जगामध्ये नव नवीन गोष्टी आत्मसात करण्यासाठी तरुण पिढीने गणितातील प्रमेय आणि सूत्रे आत्मसात केली पाहिजेत. समन्वयक डॉ.के.बी.पाटील यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख सहा.प्राध्यापक डी.पी.गावडे यांनी करून दिली. जी. ए.भोसले यांनी आभार सूत्रसंचालन केले. सहा.प्राध्यापक डॉ.एन.एस.रणदिवे यांनी आभार मानले.

लोकमत

# अन्वेषण स्पर्धेचे उद्यापासून आयोजन

कोल्हापूर : नवी दिल्लीतील असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू) व शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे गुरुवारपासून 'अन्वेषण (वेस्ट झोन)- विद्यार्थी संशोधन अधिवेशन' या दोन दिवसीय स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र व गुजरातमधील १० विद्यापीठामधून ११४ विद्यार्थी सहभागी होणार आहेत. शेती, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, आरोग्य विज्ञान आणि संबंधित विषय, फार्मसी, पोषण, सामाजिक शास्त्र, मानसशास्त्र, वाणिज्य आणि कायदा, आंतरविद्याशाखा या प्रकारात ही स्पर्धा होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर
27 DEC 2023
तरूण भारत

# विद्यापीठात उद्या अन्वेषण स्पर्धा

कोल्हापूर : नवी दिल्ली येथील असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीस, शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात बन्वेषण (बेस्ट झोत) स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धा २८ ते २९ डिसेंबर अशा दोन दिवस होणार आहेत. या स्पर्धा शेती, मूलभूम विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, आरोग्य विज्ञान आणि संबंधीत विषय, फार्मसी, पोशाण, सामाजिकशास्त्र, मानसशास्त्र, वाणिज्य आणि कायदा, आंतरविद्याशाखा या प्रकारात होणार आहेत. संपूर्ण देशात संशोधनातील प्रतित्रेला प्रोत्साहन देणे, तरूण संशोधकांच्या शिक्षण आणि प्रशिक्षणासाठी विविध प्रायोजकांच्या सहकार्याने आर्थिक आणि भौतिक संसाधने वाढवण. संभाव्य विद्यार्थ्यांचे कौशल्य वाडविण्यासाठी योग्य प्रोत्साहन देणे. निवडलेल्या संस्थांच्या गटामध्ये गहन संशोधन संस्कृती सुरू करणे असा या सपर्धेचा हेतू आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2023
तरुण भारत

# दूरशिक्षणतर्फे पीएच. डी. प्रवेश परीक्षा कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्यावतीने ऑनलाइन पीएच. डी. प्रवेश परीक्षा कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या वतीने पीएच.डी प्रवेश २०२३-२४ च्या प्रक्रियेसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज १० जानेवारीपर्यंत मागविण्यात आलेले आहेत. ही कार्यशाळा दोन भागात होणार आहे. त्यामध्ये पहिल्या भागात सामान्य ज्ञान व संशोधन पद्धती तसेच दुसऱ्या भागात मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र , इतिहास, गणित, वाणिज्य, व्यवस्थापन आदी विषयानुसार मार्गदर्शन केले जाणार आहे. तरी लिंकद्वारे सहभागी व्हावे, असे आवाहन संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.

लोकमत

# पीएच.डी. प्रवेश परीक्षा कार्यशाळा : मोरे

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या वतीने ऑनलाइन पीएच.डी. प्रवेश परीक्षा कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. विद्यापीठाच्या वतीने पीएच.डी. प्रवेश २०२३-२४ च्या प्रक्रियेसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून १० जानेवारीपर्यंत अर्ज मागविले आहेत. याबाबत पीएच.डी. प्रवेश परीक्षा तयारी कार्यशाळा आयोजित केली जाणार आहे. यात पहिल्या भागात सामान्य ज्ञान व संशोधन पद्धती तसेच दुसऱ्या भागात मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, आदी विषयांनुसार मार्गदर्शन केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2023
तरुण भारत

# नाईट कॉलेजमध्ये मोडी लिपी प्रवेश अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर :** मोडी लिपीचे प्रशिक्षण देण्यासाठी नाईट कॉलेज कोल्हापूरच्या मराठी विभागाच्या वतीने १ जानेवारी २०२४ पासून एक महिन्याचा 'मोडीलिपी प्रमाणपत्र कोर्स' आयोजित करण्यात आला आहे. या कोर्सच्या प्रवेशासाठी ३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मान्यताप्राप्त या कोर्समध्ये मोडीलिपीचे वाचन व लेखन यांचे संपूर्ण प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. नाईट कॉलेजमध्ये सायंकाळी ६ ते ८ या वेळेत कोर्स होणार आहे. प्रवेशासाठी इयत्ता १० वी उत्तीर्ण असावे, वयाचे कोणतेही बंधन नाही. तरी मोडी शिकू इच्छिणाऱ्यांनी मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे यांनी केले आहे.

27 DEC 2023 पुढारी जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ जपणार साहसी कलांचा वारसा !

## युद्धकला, मर्दानी खेळांसह विविध कलांचे मिळणार प्रशिक्षण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

रांगड्या महाराष्ट्राचा अभिमान असणाऱ्या पारंपरिक साहसी कलांचा वारसा जपण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिवाजी विद्यापीठाचे हाती घेतले आहे. या अंतर्गत शिवकालीन युद्धकला आणि विविध मर्दानी खेळांचे धडे विद्यार्थ्यांना मिळणार आहेत. विद्यापीठाच्या अधिविभाग, वसतिगृह व संलग्न महाविद्यालयात याबाबतचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. अशाप्रकारचे प्रशिक्षण देणारे शिवाजी विद्यापीठ पहिले विद्यापीठ ठरणार आहे.



सध्याच्या काळात आधुनिक शस्त्रास्त्रांचा वापर वाढला असला तरी भारतीय प्राचीन युद्धकलांचे महत्त्व अबाधित आहे. तलवार, विटा, भाला, दांडपट्टा, फरी-गदगा, काठी-बंदाटी यासह विविध शस्त्रांचा वापर शिवकाळापासून होत आहे. शिवछत्रपतींच्या हा लढवय्या वारसा नव्या पिढीला मिळावा, या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाने या प्रशिक्षणाची योजना आखली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या नुकत्याच झालेल्या अधिसभेत कोल्हापुरातील पारंपरिक, शिवकालीन साहसी व मर्दानी खेळांचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण द्यावे, असा ठराव मंजूर झाला आहे. लवकरच कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भातील समिती गठीत होणार आहे. मर्दानी, साहसी खेळ कोणते असावेत, प्रशिक्षण प्रकार तसेच मुलींसाठी वेगळे प्रशिक्षण देण्यातबाबत ठरणार आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

"

क्रीडा विभागामार्फत अधिविभागातील, वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी पारंपरिक शिवकालीन साहसी व मर्दानी खेळांचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण वर्ग सुरू करावेत, अशी मागणी केली होती. युवक-युवतींना स्व-रक्षणासाठी मर्दानी साहसी इतिहासकालीन खेळ शिकवणे काळाची गरज आहे. संस्कृती व कलेचे जतन होईल. मोबाईल व टी.व्ही.च्या अतिरेकी वापरातून मुलांना बाहेर काढता येईल.

- **रतन बापू कांबळे**, शिवाजी विद्यापीठ अधिसभा सदस्य


शिवकालीन साहसी व मर्दानी खेळ प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना आत्मसंरक्षणाचे धडे मिळतील. पारंपरिक खेळ व संस्कृतीची माहिती मिळेल. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास हातभार लागेल. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थी प्रतिनिधीत्व करतील.

- **डॉ. शरद बनसोडे**, संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभाग

27 DEC 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



भोवताल

# संकल्पासह कृती हवी...

डॉ. व्ही.एन. शिंदे

पाहता, पाहता २०२३ साल सरत आले. नव्या वर्षाची चाहूल लागली. लवकरच २०२४ सुरू होणार. नव्या वर्षाचे नवे संकल्प करणार. अनेकांचे नववर्षातील संकल्प किती पूर्ण होतात हा अभ्यासण्याचा विषय आहे. आपले वैयक्तिक संकल्प मग ते व्यायाम करण्याचे असोत किंवा एखादी वाईट सवय सोडण्याचे असोत, बहुतांश लोकांचे पूर्ण होत नाहीत. पण तरीही नवे वर्ष आले की, अनेक जण संकल्प सोडतात. हे असं करणार किंवा तसं करणार. पर्यावरणतज्ज्ञ मात्र वेगळ्याच चिंतेने ग्रस्त आहेत. त्यांची मनोमन इच्छा आहे की, जगातील प्रत्येकाने एक संकल्प करावा. तो प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मनापासून प्रयत्न करावेत आणि पृथ्वीवरील पर्यावरण वाचवावे, पूर्ववत करावे.

पर्यावरणतज्ज्ञांची चिंता आणि म्हणणे समजून घेण्यासाठी २०२३ या गतवर्षामध्ये घडलेल्या घटनांचे पुनरावलोकन करायला हवे. मागील वर्षीचा उन्हाळा म्हणावा तसा कडक नव्हता. त्याचवेळी पर्यावरणतज्ज्ञांच्या लक्षात आले होते की, यावर्षी निसर्गाचा लहरीपणा वाढणार आहे. त्याचवेळी पर्यावरण अभ्यासकांनी इंटरगव्हर्मेंटल पॅनेल फॉर क्लायमेट चेंज संस्थेच्या माध्यमांतून अहवाल सादर केला. या अहवालामध्ये निसर्ग कसा वागणार आहे, याची माहिती दिली होती. त्यामध्ये पुढील काही वर्षांत निसर्गाचा लहरीपणाचा फटका कसा बसेल, हे ही सांगण्यात आले होते. मात्र, या अहवालात काही वर्षांत असे नमूद केले होते, ते याच वर्षात अनुभवयास मिळेल असे कोणालाच वाटले नव्हते.

त्यानंतरचा गतवर्षीचा उन्हाळा कमी कडक होता. त्यामुळे अंदाज पाऊसही कमी पडेल असाच होता. मात्र, संशोधकांच्या सांगण्याप्रमाणे पाऊस पडला. पडेल तेथे पाऊस मोठ्या प्रमाणात पडला, इतरत्र मात्र दुष्काळाची छाया सोडून गेला. ज्या भागात पाऊस पडला, तेथे महापूर आले. हजारो कोटी रुपयांचे नुकसान झाले. मोठ्या प्रमाणात निसर्गाची हानी झाली. अरबी समुद्रात येणाऱ्या वादळांचे प्रमाण वाढले. महाराष्ट्राच्या बहुतांश भागांत पावसाने काढता पाय घेतला. मान्सून आला म्हणून शेतकरी खुश होतो न होतो, तोपर्यंत अरबी समुद्रात वादळ आले. या वादळाने मान्सूनच्या पावसाची दिशा आणि दशा दोन्हीमध्ये मोठा बदल केला. महाराष्ट्रात मान्सून रेंगाळला नाही. कोकणात धो-धो बरसला, पण काही दिवसात तेथील गाशा गुंडाळून, पश्चिम महाराष्ट्राला वळसा देऊन तो पुढे थेट हिमाचल प्रदेश, हरयाणा, उत्तराखंड भागात हातपाय पसरून धिंगाणा घालत बसला. तेथे शासकीय आकड्यात केलेली हानी अब्जावधींची आहे. पावसाने तेथे इतका धुमाकूळ घातला की, या पावसात निसर्गाचीही मोठ्या प्रमाणात हानी झाली. लाखो वृक्ष उन्मळून पडले. कित्येक दरडी कोसळल्या, रस्ते वाहून गेले, विजेचे खांब वाकले किंवा उन्मळून पडले. लाखो जीव वाहून गेले. मानवी जीवितहानी मोठ्या प्रमाणात झाली नाही; कारण मानवाला हवामानाचा अंदाज समजतो. तो स्वतःच्या सुरक्षेची काळजी घेऊ शकतो. मात्र, अनेक पाळीव प्राणी आणि जंगलातील मुक्या जीवांना, जीवानिशी जावे लागले.

पावसाळ्याचा हा प्रताप संपून हिवाळा सुरू झाला. हिवाळ्यात यावर्षी म्हणावी तशी थंडी काही पडली नाही. थंडीची लाट येणार म्हणून अनेकांनी मोठ्या आवाजात सांगितले, मात्र थंडी आली असे वाटेपर्यंत पळून जात होती. थंडीच्या दिवसात पारा उतरायचे नाव घेत नाही. मात्र, यावर्षी एकदम १६-१७ डिग्री सेल्सियसपर्यंत पारा खाली येतो आणि लगेच दुसऱ्या दिवशी विशीच्यावर जाऊन बसतो. असे दोन-तीन वेळा आजवर घडले. अशा थंडीच्या दिवसात पावसाचे येणे नसते, मात्र ऐन पिके कापणीला आलेली असताना तो ऐन हिवाळ्यात धो-धो कोसळला. शेतकऱ्यांच्या तोंडचा घास पळवला. कांद्यासारखे पीक शेतातच कुजले. द्राक्षांची केलेली छाटणी वाया गेली. काहींनी लवकर छाटणी केली, त्यांच्या बागेतील द्राक्षे काढणीला आलेली. त्या तयार घडांचे पाणी झाले. शब्दशः शेतकऱ्यांचे सर्व कष्ट पाण्यात गेले. लोकांनी हिवाळ्यात पावसाळा अनुभवला. आकाशातून पडणारे पाणी एरवी शेतकऱ्याचा चेहरा फुलवते. मात्र, हिवाळ्यातील पावसाने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले. शेतीसोबत शेतकऱ्याचे डोळे ओले केले. पिकाला जगवणारा पाऊस पिकाला झोपवणारा ठरला.

आता कोठे थंडीची सुरुवात झाली, तोपर्यंत जलसंधारण विभागाला पाणी काटकसरीने वापरण्याचे निर्देश पारित करावे लागले आहेत. मुळात पावसाळ्यातील पाऊस कमी पडल्याने तलाव पूर्ण क्षमतेने भरलेले नव्हते. त्यामध्ये हिवाळ्यातही तापमान नेहमीसारखे थंड नसल्याने बाष्पीभवनाचा वेग वाढला. परिणामी तलावातील पाण्याची पातळी वेगाने घटत चालली आहे. एकूणच यावर्षीच्या उन्हाळ्यात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात होणार आहे. हिवाळ्यात शेकडो गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू झाला आहे. टँकरने पुरवल्या जाणाऱ्या अनेक तलावांत गतवर्षीपेक्षा २० ते ३० टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा राहिला आहे. यामुळे सर्वात प्रथम शेतीला होणाऱ्या पाणी पुरवठ्यामध्ये कपात करण्यात आली. ऊसाचे गाळपही लवकर सुरू करण्यात आले.

निसर्गाचे चक्र बदलले असे आपण म्हणतो. मात्र, हे ज्या कारणाने घडले ते समजूनही आपण ती कारणे दूर करण्यासाठी मनापासून प्रयत्न करत नाही. पर्यावरण संरक्षण, पर्यावरण संवर्धन या गोष्टी बोलण्यासाठी, इतरांनी काय करावे हे सांगण्यासाठी चांगल्या असतात असे वाटते. या विषयावर बोलणारे लोक खूप पोटतिडकीने बोलतात. मात्र, अपवाद वगळता फारच कमी लोक प्रत्यक्ष कृती करताना दिसतात. जे कृती करतात, ती अनेकदा विषय समजून घेऊन नसते. उदाहरणादाखल, पर्यावरण संवर्धनासाठी झाडे लावावीत असे सांगण्यात येते. हे खरेही आहे. पर्यावरण संतुलन राखायचे असेल तर झाडे लावायलाच हवीत. झाडे लावण्यासाठी अनेक जण पुढे येतात, झाडे लावतातही. मात्र, त्यांचे संगोपन करण्याची जागरूकता मात्र फारच कमी लोक दाखवतात. झाडे लावण्याचा कार्यक्रम पाहताना अनेकदा हसू आणि आसू येते. याचे कारण म्हणजे झाडे लावतानाही इथल्या जीवसृष्टीला आवश्यक कोणती झाडे आहेत, यापेक्षा आपल्या नजरेला जी झाडे भावतात ती झाडे लावली जातात. परिणामी अनेकदा त्या भागाचे पर्यावरण सुदृढ होण्यापेक्षा ते जास्तच बिघडते. उदाहरणार्थ ग्लिरिसिडीयासारख्या झाडांमुळे जमिनीचा पोत सुधारतो, हे जरी खरे असले तरी तेथील उंदरांचा अधिवास संपतो आणि ते तेथून स्थलांतरित होतात. त्यांच्यामागे सापही निघून जातात. त्या झाडांखाली इथल्या जनावरांना आवश्यक असणारा चारा उगवत नाही. त्यामुळे आपोआप इतर जीवही तेथे राहात नाहीत.

त्यामुळे आता तरी जुने सर्व सोडायला हवे. तोच नव्या वर्षाचा नवा संकल्प करूया. पर्यावरण समजून घेऊया आणि त्याचे संरक्षण करण्यासाठी मनापासून प्रयत्न करूया!

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००